# राष्ट्र*

मूळ लेखकः ॲलन बाद्यू

मराठी रूपांतरः अनुज देशपांडे

ॲलन बाद्यू (Alain Badiou) हे आज जगातील एक प्रसिद्ध फ्रेंच तत्त्वज्ञ आहेत. समकालीन तत्त्वविचारामध्ये त्यांचं नाव आज जगभरात आदरानं घेतलं जातं. गेली ४० वर्षं ते सातत्यानं राजकारण, साम्यवाद, कला, तत्त्वज्ञान, मार्क्सवादी तत्त्वज्ञान याबद्दल नवी मांडणी करत आहेत. ‘बीइंग ॲंड इव्हेंट’, ‘लॉजिक्स ऑफ द वर्ल्ड’, ‘थिअरी ऑफ द सब्जेक्ट’, ‘द कम्युनिस्ट हायपोथिसीस’, ‘प्लेटोज रिपब्लिक’, ‘द ट्रू लाईफ’ अशी त्यांची अनेक पुस्तकं; तसंच राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक घटनांवर भाष्य करणारे अनेक लेख, भाषणं छापून आलेली आहेत. ‘बीईंग’, ‘ट्रुथ’, ‘सब्जेक्ट’, ‘इव्हेंट’अशा तत्त्वज्ञानातील अभिजात संकल्पनांबद्दल बाद्यू यांनी नवी मांडणी केलेली आहे आणि ते म्हणतात की, ती उत्तर-आधुनिकवादी तर नाहीच; पण आधुनिकतावादाची निव्वळ पुनरावृत्ती देखील नाही. मे १९६८ मध्ये पॅरीसमध्ये झालेल्या विद्यार्थी निदर्शनात त्यांचा सक्रीय सहभाग होता आणि खरंतर त्याही आधीपासून ते फ्रान्समधल्या डाव्या, मार्क्सवादी संघटनांशी जोडलेले होते. गेल्या काही वर्षांपासून युरोप, अमेरिका व जगभरातील अनेक विद्यापीठांमध्ये त्यांची भाषणं होत आहेत, तसेच जागतिक नियतकालिकांमध्येही त्यांचं लिखाण छापून येतं. आजच्या नव-उदारवादी भांडवलशाहीच्या काळात, बाद्यू यांच्या मांडणीतील ‘पोलिटिकल फोर्स’ म्हणून कम्युनिझम/साम्यवादाची गरज सातत्यानं अधोरेखित होत राहते.

ॲलन बाद्यू हे लेखक, नाटककार देखील आहेत. ‘अहमद, द फिलॉसॉफर’ हे त्यांचं आणखी एक पुस्तक. यामध्ये ३४ लघुनाटकांमधून त्यांनी तत्त्वज्ञानातील काही महत्त्वाच्या, जटील आणि अभिजात संकल्पना नाट्यमय पद्धतीने उलगडल्या आहेत. सुरुवातीला लहान मुलांसाठी विनोदी शैलीत लिहिलेल्या या नाटकांत ‘राजकारण’, ‘द्वंद्व’, ‘भाषा’, ‘काव्य’, ‘समाज’, ‘सत्य’, ‘अनंतता’, ‘मृत्यू’, ‘कुटुंब’, ‘विचार’, ‘अंतर्विरोध’ अशी वेगवेगळ्या संकल्पनांबद्दलची लघुनाटकं त्यांनी लिहिली, जी नंतर अर्थातच फक्त लहान मुलांसाठी मर्यादित राहिली नाहीत. या सर्व नाटकांतील नायक- अहमद ह्याला फ्रेंच संदर्भात पाहायचं तर, फ्रान्समध्ये स्थलांतरित अल्जेरियन मुस्लीम आणि तिथल्या ‘नाही रे’ वर्गाचा प्रतिनिधी म्हणून तो

आपल्यासमोर येतो. एक पात्र म्हणून पाहिलं तर, तो पॅरीसच्या बाहेरच्या हाउसिंग प्रोजेक्टमध्ये राहणारा गरीब बांधकाम मजूर आहे, जो त्याच वेळी आणखी कुठल्या पात्राला धडा शिकवणारा, हुशारीने युक्तिवाद करणारा, जुनीच संकल्पना नव्या प्रकाशात मांडणारा फिलोसॉफर ही असतो, हेच त्याचं वैशिष्ट्य आहे आणि त्याची वैश्विकतासुद्धा. या नाटकाबद्दल बोलताना इंग्रजी आवृत्तीच्या प्रस्तावनेत बाद्यू म्हणतात, " मला आशा आहे की, जगातील इंग्रजी वाचक वर्गालाही हे वाचून तितकंच हसू येईल आणि ही नाटकं सादर व्हावीत यासाठी ते काही प्रयत्न करतील. शेवटी, अतिश्रीमंत, उच्चभ्रू, सत्ताधारी लोकांच्या मोठमोठ्या खेळातील वैचारिक दारिद्र्य आणि दोष/कमजोरी तळागाळातील लोकांच्या नजरेतून पाहणं, हाच इसवी सन पूर्व चौथ्या शतकातील ॲरिस्टोफेन्सपासून विसाव्या शतकातील चार्ली चॅप्लिनपर्यंत सर्वोत्तम विनोदाचा वैश्विक मूलमंत्र राहिलेला आहे."[1]

याच लघुनाटकांमधील 'The Nation' हे नाटक मराठीत रूपांतर करून 'नाटक कंपनी' या संस्थेतर्फे फेब्रुवारी २०२० मध्ये पुण्यात झालेल्या 'सारंग नाट्यमहोत्सवात' पहिल्यांदा सादर झालं. भारतीय आणि मराठी संदर्भानुसार काही नावं, विशेष नामं यांचं मराठीत रूपांतर केलेलं आहे; पण 'अहमद' तसाच आहे. डिसेंबर २०१९ मध्ये 'सीएए-एनआरसी' हा मुस्लीम, अल्पसंख्यांक आणि गरीब-विरोधी कायदा सरकारने पास केला आणि त्याविरोधात संपूर्ण देशात मोठ्या प्रमाणावर निदर्शनं झाली, ही पार्श्वभूमी या रूपांतरास होती.

****

* हाकारा । hākārā या मराठी व इंग्रजीत प्रकाशित होणाऱ्या ऑनलाईन नियतकालिकाच्या अकराव्या आवृत्तीमध्ये ॲलन बाद्यु लिखित 'द नेशन' या लघुनाटकाचे मराठी भाषांतर प्रकाशित झाले आहे . मराठी नाटकाच्या सादरीकरणासाठी भाषांतरकाराची परवानगी आवश्यक. परवानगीसाठी अनुज देशपांडे यांच्याशी anujdeshpande04@gmail.com या ईमेलद्वारे संपर्क साधावा.

1 Ahmed the Philosopher, Litvak Joseph, Pg 9

(तिशीतील ताईसाहेब एका तरुणापासून पिच्छा सोडवून घेण्याच्या नादात घाईघाईने चुकून स्टेजवर येतात.)

**ताईसाहेब**ः नाही. नाही. हे शक्यच नाही. जे व्हायचं ते होऊ दे. अजिबात नाही. ‘राष्ट्रीय एकता पक्षा’च्या पुणे शहर कमिटीची सदस्य, महिला मोर्चाची प्रदेशाध्यक्ष आणि पूरग्रस्त, गरीब विद्यार्थी, अनाथ मुलांसाठी प्रत्यक्ष रस्त्यावर उतरून काम करणारी समाजसेविका या नात्याने मी बोलतीये. माझे पती मिस्टर पंडित हे फायटर प्लेन्स, अं.. लढाऊ विमानं बनवणाऱ्या एका लीडिंग प्रायव्हेट कंपनीत महत्त्वाच्या पदावर आहेत, जिचा ॲन्युअल टर्नओव्हर काही मिलियन डॉलर्समध्ये असतो. माझे वडील खासदार साहेबांचे सल्लागार आणि साहाय्यक म्हणून अनेक वर्ष काम करतायत. माझी आई ‘आम्ही कोथरूडकर’ मंचातर्फे दरवर्षी होणाऱ्या ‘कोथरूड सांस्कृतिक महोत्सवा’ची आयोजक आहे. मी एका चांगल्या घरातली, चांगले संस्कार मिळालेली मुलगी आहे, जिला अजूनही कधीकधी सुंदर दिसायला, attractive दिसायला आवडतं आणि मला कधी वाटलंच तर unattractive सुद्धा ! या सगळ्याच्याही पलीकडे, मी या देशाची एक जागरूक नागरिक आहे. एक स्वतंत्र विचारांची स्त्री आहे. पण तरी तू जे म्हणतोयस, ते मी मान्यच करू शकत नाही. नो! जस्ट फरगेट अबाउट इट..

(तो तरुण म्हणजेच अहमद प्रेक्षकांकडे बघून अवघडल्याप्रमाणे हसतो आणि नम्रपणे उत्तर देतो)

**अहमद**ः ताई, तुम्ही एकदा माझं म्हणणं मला नीट डिटेलमध्ये मांडू द्या. मी कुठल्याही पक्षाच्या कुठल्याही शाखेचा अध्यक्ष नाही आणि कधी होणारही नाही. माझे वडील कुठल्याही साहेबांचे सल्लागार नाहीत आणि कधी नसतील. माझी आई कशाची आयोजक नाही अन् माझे कोणी प्रायोजक नाही. मी.. खरंतर काहीच नाही. तरीपण मी असा हितं अस्तित्वात हाये. आणि जीव मुठीत धरून, सुमडीत जगतोय. अन् मी कधी चांगल्या घरातला, चांगले संस्कार असलेला होईल असंही मला वाटत नाय. पण म्हणजे नक्की असतं तरी काय ?

(‘चांगल्या घरातलं’ म्हणजे काय यावर इम्प्रोव्हायझेशन.)

हां. तर लढाऊ विमान बनवणाऱ्या कंपनीतल्या कोणाशीच माझं लग्न झालेलं नाही आणि कधी होणार पण नाही. दोन वेळच्या जेवणासाठी मी लढाऊपने भटकत असतो; तरीपण तुमच्यासारख्या लोकांना माझ्यासारखा खटकत असतो. एक झाटू गांडूळ ए ओ मी.

दिसायला काळा आणि जातीने शूद्र असलो, तरी माझे विचार म्हणजे मी आहे. मी प्रबुद्ध आहे !

**ताईसाहेबः** (जातीच्या उल्लेखाने गांगरते, दुखावल्याप्रमाणे) प्च.. नाही रे.. एक मिनिट... आपण ज्या गोष्टीबद्दल बोलतोय त्यात जातीचा, रंगाचा कुठे संबंधच येत नाही. काळे, गोरे, गव्हाळ, लालसर, बारीक डोळ्यांचे, टोपी घालणारे-न घालणारे हे सगळे भारतीयच आहेत. हे सगळेच भारतीय आहेत. आता.. आमच्या घरी येणाऱ्या कामवाल्या बाई.. त्यांचे डोळे असे छोटे म्हणजे.. नेपाळी आहेत बहुतेक त्या.. पण तरीसुद्धा त्या मनाने खूप चांगल्या आहेत, व्यवस्थित वागतात आणि आत्तापर्यंत साधा कंगवासुद्धा कधी त्यांनी कपाटातून उचललेला नाही.

**अहमदः** (नक्कल करत) साधा भगवासुद्धा कधी त्यांनी गादीखालून -

**ताईसाहेबः** (राग आवरत, त्याला प्रेमाने समजावत ) हे काय ? सतत तेवढंच दिसतं का सगळीकडे ? मूळचा स्वभावच तसा असल्यावर... जाऊ दे. मी शेवटचं सांगतीय, नाऽऽऽऽही!

**अहमदः** नाही? कोई अगर किसी चीज को ना कह रहा है, तो उसे ये पता होना चाहिये की, वो किस हां के बारे में बोल रहा है. किसी हां के बजाए, कोई ना हो ही नही सकता. ना है क्यूंकी हां है ! कळतंय का? तुम्ही सांगा तुमचा होकार कशाला आहे, मग त्यावरून कळेलच की तुमचा नकार त्याबरोबर जातोय का, पण तुमचा होकारच जर काहीतरी नाकारत असेल तर मग त्या नकाराला काही अर्थच नाही ना !

(ती गोंधळलेली.)

('होकार' आणि नकार यावर इम्प्रोव्हायझेशन करतो.)

ठीके. तुम्ही म्हणताय तुम्ही एका चांगल्या घरातल्या, जागरूक वगैरे वगैरे व्यक्ती आहात, तर मग मला सांगा, आपल्यासमोर हा जो प्रश्न आहे त्याच्याबद्दल तुमचा नेमका कशाला होकार आहे ? हो म्हणा, एवढीच विनंती आहे.

**ताईसाहेबः** माझा होकार फक्त एकाच गोष्टीला आहे. भारतीय संविधान. इथला कायदा. फक्त त्यालाच माझा होकार आहे, आणि त्याच्यामुळेच तू इथं माझ्याशी वाद घालू शकतोयस. इथले नागरिक हे संविधान मानणाऱ्या प्रतिनिधींना निवडून देतात. आणि हे संविधान, ह्या कायद्यानुसारच ठरतं की कोण नक्की कोण आहे, कोणाचे काय अधिकार आहेत, कोणाचे

काय अधिकार नाहीत किंवा कोणाला काहीच अधिकार नाहीत. हे बघ, कायद्यानुसार या दोघांमध्ये फरक आहे. सगळी डॉक्युमेंट्स असलेले, ऑफिशियल, लीगल आणि कायदेशीर कामगार. साहेब स्वतः आपल्या भाषणात म्हणलेत की, अशा कामगारांचं आपल्या इथं स्वागतच आहे.. पण ते सोडून बाकीचे जे आहेत - कागदपत्र नसलेले, इललीगली इथं येऊन गर्दी करणारे, सगळी घाण करणारे अस्वच्छ लोकं.. ते नक्की कुठून आलेत, कोणी घुसवलंय त्यांना? .... घुसखोरच आहेत ना ते ! त्यांचं काय?

**अहमदः** त्यांचं आजकाल डिटेन्शन सेंटरमध्ये स्वागत आहे ! म्हणजे थोडक्यात या कायद्याचा, ज्याला तुम्ही हो म्हणता, त्याचा असा अर्थय की, जोपर्यंत इथला कायदा एखाद्याला सांगत नाही की, तो **इथं** आहे तोपर्यंत तो माणूस **इथला** नाहीच. पण तो तर **इथं** आहे. वो यहाँ है ! तो जर इथं असेल, तर कायदा हे म्हणूच शकणार नाही की तो इथं नाहीच ! आणि तसं जर झालं तर तुमचा होकार हा खरंतर होकार नाहीच. नकार आहे. असल्या नकाराला तुम्ही होकार देता. ‘तू इथला नाहीस’ म्हणून ज्याला इथं नाकारतात; त्याला तुम्ही होकार देता ! म्हंजे हितल्या संविधानाला तुमचा जो होकार आहे, त्यात होकाराच्या पण आधी सरळ सरळ नकारच आहे ! म्हणूनच तुमचे कार्यकर्ते हितल्या लोकांच्या मागे लागलेले असतात. “तुम्ही हितले नाही. हितले नाही तुम्ही. यहाँ के नही हो तुम लोग. निकलो. एऽऽ चल एऽऽ पाणीपुरी, हे भैय्या लोकं.. ”

(भुंकल्यासारखं करतो )

**ताईसाहेबः** पण ते गरजेचं आहे न... ! गरजेचं आहे ते.. इथले कोण आहेत आणि इथले कोण नाहीयत, इथले नसतील तर कशासाठी आलेत, हे सेग्रीगेट करायलाच पाहिजेत.

**अहमदः** अहो, पण ते **इथं** आहेत न ! आणि तुम्ही ! तुम्ही त्यांच्या **इथं** असण्यालाच नकार देताय.. कारण काय? तर ते ‘**इथले**’ नाहीत. बरं... जे इथं आहेत ते ‘**इथले**’ नसतील, तर तुमच्यानुसार कोण ‘**इथले**’ आहेत म्याडम ?

**ताईसाहेबः** ... इंडियन्स !! भारतीय. जे कोणी भारतीय आहेत ते. स्त्रिया आणि पुरुष.. भारतीय लोक इथले आहेत आणि ते इथं आहेत.

**अहमदः** पण शेवटी... भारतीय म्हंजे कोण ?

**ताईसाहेब**ः कायद्यानुसार जे भारतीय आहेत ते ! फॉर एग्झाम्पल , माझे बाबा, माझी आई. माझा नवरा.. खासदार साहेब ! माझी शाळेतली मैत्रीण जी आता अमेरिकेला असते; पण ती खरंतर भारतीयच आहे. म्हणजे जे... जे.. आधीपासून.. खूप पूर्वीपासून... भारतीय आहेत ते.

**अहमद**ः (चक्रावून ) खूप पूर्वीपासून ? म्हणजे नक्की ओ कधी पासून? तुमच्या त्या 'सनातन' काळापासून? आं ? अन् तेही कायद्यानं? तिच्यायला. हा देश आणि हितला कायदा दोन्हीपण तुमच्या बापानंच शोधलाय काय ?

**ताईसाहेबः** मग काय तुझ्या बापानं शोधलाय ?

(दोघेही अचानक तावातावाने आरडा-ओरडा करत भांडू लागतात.)

**अहमदः** थांबा. थांबा जरा... इथं... इथं एक घोळ आहे. आपण एका चक्रात सापडतोय. दुष्टचक्रात.

**ताईसाहेब**ः पपा, साहेबांना तेच सांगत असतात,. तुम्ही विरोधकांच्या टीकेला सतत उत्तरं देत बसलात, सतत त्यांना गोंजारत राहिलात, तर तुम्हीसुद्धा त्या दुष्टचक्रात अडकाल.

**अहमदः** पण इथं हे जे दुष्टचक्र आहे, त्याला तुमचे साहेब कायम गोंजारत आलेत. त्यांच्याही आधीपासून ते चाललंय. कारण त्यांना तेच हवंय. हे दुष्टचक्र साधंसुधं नाही. त्याला सुडाचा जहरी स्पर्श ए !

(Vicious Circle / दुष्टचक्र यावर इम्प्रोव्हायझेशन)

**अहमद**ः हे बघा, एक दिवस कायदा येतो आणि म्हणतो, ' जे कोणी **इथं** आहेत, ते **इथलेच** आहेत. ते भारतीय आहेत." मग कायदा नंतर काही काळाने पुन्हा उगवतो आणि म्हणतो, 'मला काही लोक दिसतायत जे **इथं** आहेत, पण ते **इथले** नाहीयेत.' ते भारतीय नाहीत. (तिला पटल्यानं ती मान डोलावते.) पण कायदा आधी म्हणल्याप्रमाणे 'भारतीय नाहीत' याचा अर्थ '**इथं नाहीत**' याशिवाय दुसरा काही नव्हताच. आठवलं ? जे इथं आहेत तेच भारतीय आहेत.. (आधीचे वाक्य परत बोलतो) आणि तसं जर का नसेल... तर मग नक्कीच याचा संबंध एकतर धर्माशी आहे; नाहीतर रेसशी आहे; नाहीतर रंग, नाहीतर वास.. याला तुम्ही नाही म्हनता. पण जेव्हा तुमच्या कामवाल्या बाईबद्दल तुम्ही बोलत असता, तेव्हा तुमच्या नाहीमध्ये मला सरळ सरळ हो ऐकू येतो न मॅडम !! धर्म-बिर्म, वंश-बिंश, जात-बित, वास-बिस काही नाही ? फक्त कायदा ? बरोबर ? जो कायदा असं म्हणतो की हे बघा, **इथं**

जे आहेत ते भारतीय आहेत, हे बघा, भारतीय जे आहेत ते **इथं** आहेत आणि जर कोणी **इथं** असेल तर त्यामध्ये हे गृहीतच आहे की, तो **इथलाच** आहे. कधीही आणि कायम ! हा कायदा कितीपण जुना झाला, त्याला आधीच काहीच आठवलं नाही, त्याची बोबडी कितीही जरी वळली तरी तो असं कधीच म्हणणार नाही की – इथं हे खरंतर **इथं** नाहीच, इथलं असणं म्हणजे **इथं** नसणं.. किंवा ते **तिथं,** आता ह्या **इथं** आलंय..

**ताईसाहेबः** (अचंबित) काय म्हणायचंय तुला ?

**अहमदः** म्हणजे असं की आपल्या संविधानाचं प्रिएम्बल बघूयात.

**ताईसाहेबः** प्रिएम्बल ?

**अहमदः** हो. काय लिहलंय प्रिएम्बलमध्ये?

**ताईसाहेबः** (एखादा मंत्र म्हणावा तसं यांत्रिकपणे म्हणू लागते) WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India into a SOVEREIGN SOCIALIST SECULAR DEMOCRATIC REPUBLIC and to secure to all its citizens...

**अहमदः** (तिला थांबवत) एक मिनिट! आधी काय येतं?

**ताईसाहेबः** कशाच्या आधी?

**अहमदः** म्हणजे सुरुवात कशानं होते?

**ताईसाहेबः** कशाची?

**अहमदः** तुम्ही आत्ता बटन दाबल्यागत मंत्रासारखं ज्याचं पठण करू लागलात, त्या प्रिएम्बलची सुरुवात कशानं होते?

**ताईसाहेबः** (पुन्हा यांत्रिकपणे) WE, THE PEOPLE OF INDIA...

**अहमदः** (तिला थांबवत) आता बघा सुरुवात कशानं होते- WE, THE PEOPLE OF INDIA. WE, THE PEOPLE OF INDIA, having solemnly resolved to constitute India. म्हणजे हा जो काही India नावाचा SOVEREIGN SOCIALIST SECULAR DEMOCRATIC REPUBLIC आहे, त्याला Constitute कोण करतं, म्हंजे घडवतं कोण? WE, THE PEOPLE OF INDIA. म्हणजेच ह्या India नावाच्या SOVEREIGN

SOCIALIST SECULAR DEMOCRATIC REPUBLIC चे जे कोणी Citizens म्हंजे नागरिक असतील त्यांच्याही आधी कोण येतं? WE, THE PEOPLE OF INDIA. आणि कोण आहेत हे WE, THE PEOPLE OF INDIA?

**ताईसाहेबः** (गोंधळून) कोण म्हणजे? सगळे?

**अहमदः** (तिला तिच्याच शब्दात अडकवून उत्तराकडे नेत) सगळे? **इथं** आहेत ते सगळे? कागदपत्र असलेले, नसलेले, कायदेशीर, बेकायदेशीर, सगळे?

**ताईसाहेबः** तुला काय हवंय? तुझा नक्की प्रस्ताव काय आहे मुळात?

**अहमदः** एक साधा सरळ होकार. एक सीधा-साधा हां. जिसका कोई ना है ही नही... जे कोणी **इथं** आहेत, ते **इथलेच** आहेत. एखादा माणूस **इथं** राहत असेल तर उगाच त्याच्या मागे लागू नका. शांतपणे जगू द्या त्याला. हा देश किंवा दुसरा कुठलाही देश, **तिथं** राहणाऱ्या लोकांनी बनलेला असतो.. विषय संपला.

**ताईसाहेबः** ह्या... ह्या... शक्यच नाही. असा होकार शक्यच नाही. या अशा भूमिकेमुळे निवडणुकीत फटका बसेल पक्षाला. बाहेरून, कुठून कुठून आलेले सगळे हे खरंतर इथलेच आहेत असं म्हणायचं ! झालं. संपलंच. आपल्या लोकांचं, आपल्या कल्चरचं, आमच्या धर्माचं काही अस्तित्वच उरणार नाही अशा-

**अहमदः** आयला ! धर्म ! आता कसं बोललात ! धर्म ! अराररारा... ह्ये काय ऐकतोय मी.. मला वाटलं फक्त संविधान मानतो आपण इथं !

**ताईसाहेबः** (सावरून घ्यायचा प्रयत्न करते; पण तिला लक्षात येतं की आपण जे बोलायला नको ते बोललो. पवित्रा बदलते.) च्यायला. ए निघ चल. निघ इथून. च्यायला..

**अहमदः** नक्की कोणाच्या आईला?

**ताईसाहेबः** दाखवते. तू परत बोल एकदा, जे इथं आहेत ते इथले वगैरे जी बडबड करत होतास.. मग दाखवते.

**अहमदः** (काठी काढतो) ओ मॅडम ! मी **इथलाच** आहे. आत्ता मी **इथं** आहे आणि **इथंच** राहणार आहे. हां. गोंजारत बसा तुम्ही कायदा. इतका गोंजारून गोंजारून असा धारदार केलाय

तुम्ही की, लोकांच्या जीवावर उठलाय. सारखं गोल-गोल फिरवून घोळ घातला तुम्ही सगळा. मीच सरळ करतो आता. हे दुष्टचक्र बरोबर मोडतो मी. (काठी उगारतो.)

नियमाला फार डोक्यावर घेऊ नका. बाबासाहेबांनी कायदा लिहिला. पण त्यांनी दुसरीकडे हेही लिहिलं, तत्त्व आणि नियम यामध्ये फरक केला पाहिजे. तत्त्वामध्ये तुम्हाला त्यानुसार वागण्याचं स्वातंत्र्य असतं. नियमात नसतं. एकतर नियम तुम्हाला मोडतो किंवा तुम्ही नियम मोडता. त्यामुळे तुम्ही किंवा मी, कोणीतरी नियम मोडायच्या आधी तुम्ही... या आता..

(ताईसाहेब आणखी अपमानित होण्याच्या आधी निघून जाते.)

(तिला जाताना बघतो आणि मग प्रेक्षकांकडे वळतो.) प्रेक्षकांना उद्देशून -

**अहमदः** दोन वेळच्या भाकरीसाठी हा लढा आहे. खरंतर, लढाऊ विमानांच्या विरोधात ! एकदम लढाऊपने जिंकावा लागतो.

हा राष्ट्रीय प्रश्न म्हंजे लय गुंतागुंतीचं प्रकरण आहे. म्हंजे असंय की, इथलं असण्यासाठी, म्हंजे, खरोखर इथलं असण्यासाठी तुमच्याकडे फक्त ह्या दोन गोष्टी पायजेत, एकतर हे ( डोक्याकडे बोट करतो ) आणि हे ( हातातली काठी दाखवतो ). **विचार आणि बळ.** Thought and force. तुम्ही **इथं** असता; पण ते पुरेसं नाही. **इथलं** असण्यासाठी, संघर्ष. तुम्ही जिथे आहात तिथे असण्यासाठी – एक निरंतर संघर्ष ! एवढं सगळं करूनसुद्धा मुळात हे सगळं इतकं महत्त्वाचं आहे का? हा प्रश्न उरतोच. हे जे कोणी वेगळीकडे जन्मलेले लोक आहेत त्यांनी आता इथं राहायचंच असं ठरवलेलंच आहे, असं यावरून वाटेल. तुम्हीच सांगा, का असं असेल ? का एवढे जिद्दी आहेत ते ? कारण आम्ही आहोत **इथं** ! आमच्या श्रमाने-घामाने आहोत इथं. थोडीफार बुद्धी आणि हे सगळं गुंतागुंतीचं जगणं यांची फार मोठी मदत झाली आम्हाला म्हणून आम्ही इथपर्यंत पोचलो. आणि आता आम्ही **इथं** आहोत. आणि असू. गोल-गोल कायदासुद्धा काही करू शकत नाही या बाबतीत.

(विचार करतो, काठीकडे पाहतो)

... 'विचार' लक्ष ठेवून असतो हां, आणि ही काठी पण. 'नाठाळाचे माथी हाणू काठी', विचारणारी - विचार करणारी – काठी... सोचनेवाला डंडा. The thinking stick. पास्कल नाम के एक फिलोसॉफरने कहा था, 'Man is a thinking reed.' Reed मतलब घास कि पत्ती. गवताची पात. तो.... यहाँ का हो सकू इसलिये, और जो कोई यहाँ है वो

सब यहाँ हो सके इसलिये, मै अहमद, एक सोचनेवाले डंडे में तबदील हो रहा हूं। जो की सबसे शक्तिशाली है। तो जो कोई यहाँ है, यहाँ ही रहना। बिलकुल मत डरना। मैं आपके साथ हूँ !

(काठी पायाला टेकवून, शून्यात बघत अहमद पुतळ्यासारखा स्तब्ध होतो.)

**अंधार**